# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*



मार्गदर्शन करताना संचालक संजीव चव्हाण, शेजारी सुधीर कुंभार, सुनील काळे व इतर.

# पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी सर्वांची : संजीव चव्हाण

▲ पाटण, दि. १ : जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणें मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. यास्तव वसुंधरेचं देणं फेडण्यासाठी पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी तुमची-आमची सर्वांची आहे, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्यावतीने जिल्हास्तरीय पर्यावरण जतन, जागृती व संवर्धन मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पर्यावरण तज्ञ सुधीर कुंभार, डब्लूआरसी संचालक सुनील काळे, पर्यावरण जतन व संवर्धन जागृती मोहिमेचे समन्वयक प्रा. सुनील पानस्कर, प्राचार्य डॉ शिरीष पवार, पर्यावरण जतन व संवर्धन मोहिमेचे सदस्य प्रा. सतीश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. संजीव चव्हाण म्हणाले, पर्यावरणाचा समतोल बिघडणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणं होय. पर्यावरणाच्या संवर्धनातून वसुंधरेचा बचाव करण्यासाठी ही काळाची गरज आहे. पृथ्वीवरील मानवजातीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन महत्त्वाचे आहे. 'निसर्ग' हे मानव, वन्यजीव, जलचर प्राणी, पक्षी आणि वनसंपत्ती यांना लाभलेलं मोठं वरदान आहे हे निश्चित. पृथ्वीवरील मानवजातीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन व्हावे, तसेच जल व वायू प्रदूषण थांबावे, या उद्देशाने या मोहिमेत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून तन-मन-धनाने भाग घ्यावा. 'एक मूल, एक झाड' लावून, त्याची निगा राखण्याची जबाबदारी घेऊया, वृक्षतोड कुठल्याही परिस्थितीत रोखली पाहिजे. 'आपणही जगा आणि इतरांनाही जगू द्या' हे ध्येय उराशी बाळगून पर्यावरण जतन, जागृती व संवर्धन ही आता लोकचळवळ उभी करूयात, असे आवाहन शेवटी त्यांनी केले.

यावेळी स्पर्धात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना कोयना एज्युकेशन सोसायटीच्यावतीने रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात आले. प्रा. सतीश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विनायक मथणे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रा. गजाजन कुंभार. प्रा. डॉ. हेमलता काटे विविध शाळांचे मुख्याधापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने हजर होते.